# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:21.04.2026** **वारः मंगळवार**

---

1. भारत आणि दक्षिण कोरिया यांच्यात विविध क्षेत्रांत सामंजस्य करार
2. केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आजपासून तीन दिवसांच्या जर्मनी दौऱ्यावर
3. तमिळनाडू विधानसभेच्या एकाच टप्प्यातील आणि पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील प्रचार आज संपणार
4. अमेरिका आणि इराण यांच्यात, इस्लामाबादमध्ये होणाऱ्या शांतता चर्चेच्या दुसऱ्या फेरीबाबत अनिश्चितता आणि
5. जम्मू काश्मीरमधील उधमपुरमध्ये झालेल्या बस दुर्घटनेत 21 जणांचा मृत्यू

**<u>भारत-दक्षिण कोरिया करार</u>**

भारताच्या दौऱ्यावर असलेले दक्षिण कोरियाचे राष्ट्राध्यक्ष ली जे म्युंग यांची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्लीत भेट घेतली. उभय नेत्यांमध्ये विविध क्षेत्रांतील सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. यात, जहाज बांधणी, पोलाद, तसंच क्रीडा, सांस्कृतिक आणि सर्जनशील उद्योग, लघु आणि मध्यम उद्योग तसंच औद्योगिक सहकार समिती आदि क्षेत्रांचा समावेश आहे. भारत आणि दक्षिण कोरिया यांच्यातील व्यापार 27 अब्ज डॉलर्सवर पोहोचला असून, 2 हजार 30 पर्यन्त तो, 50 अब्ज डॉलर्स पर्यंत वाढवण्याचं उद्दिष्ट असल्याचं पंतप्रधान म्हणाले. उभय देश, पुढील दशकाच्या यशाच्या पाया घालत असून, जागतिक तणावाच्या या काळात, दोन्ही देश शांतता आणि स्थिरतेचा संदेश देत आहेत, असं पंतप्रधान पुढे म्हणाले.

दरम्यान, दक्षिण कोरियाचे राष्ट्राध्यक्ष ली जे म्युंग यांची, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल राष्ट्रपती भवनात भेट घेतली. ली जे म्युंग यांच्या सन्मानार्थ एका विशेष मेजवानीचं आयोजन करण्यात आलं होतं.

**<u>राष्ट्रपती-ओडिशा दौरा</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज एक दिवसाच्या ओडिशा दौऱ्यावर जात आहेत. राउरकेला इथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात त्यांच्या हस्ते तारांगण, विज्ञान केंद्र तसंच, 'निर्मल मुंडा परिवेश पथ'चं उद्घाटन करण्यात येणार आहे. तसंच, आदिवासी संग्रहालय आणि 'एकात्मिक कमांड आणि नियंत्रण केंद्राचं' उद्घाटन त्यांच्या हस्ते होणार आहे.

**<u>नागरी सेवा दिन</u>**

18 व्या 'नागरी सेवा दिना'निमित्त, आज नवी दिल्लीत आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाला उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन नागरी सेवकांना संबोधित करतील. या कार्यक्रमाचे आयोजन 'प्रशासनिक सुधारणा आणि सार्वजनिक तक्रार निवारण विभागातर्फे' करण्यात आले आहे.'विकसित भारत: नागरिक-केंद्रित प्रशासन आणि शेवटच्या टप्प्यापर्यंत विकास'ही या वर्षीच्या कार्यक्रमाची मध्यवर्ती संकल्पना आहे. या कार्यक्रमाला, सार्वजनिक तक्रार निवारण आणि निवृत्तीवेतन राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह; सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्री जितन राम मांझी; आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जगत प्रकाश नड्डा; तसेच कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान, विभागातील अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित राहणार आहेत.

**<u>राजनाथ सिंह-जर्मनी दौरा</u>**

केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आजपासून तीन दिवसांच्या जर्मनी दौऱ्यावर जात आहेत. या दौऱ्यादरम्यान, ते जर्मनीचे संरक्षण मंत्री बोरिस पिस्टोरियस यांच्याशी, द्विपक्षीय चर्चा करणार आहेत. संरक्षण क्षेत्रातील औद्योगिक सहकार्य वाढवणे,

लष्करी स्तरावरील परस्पर संबंध अधिक दृढ करणं तसंच, सायबर सुरक्षा, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ड्रोन यांसारख्या उदयोन्मुख क्षेत्रांमधील संधींचा शोध घेण्यावर दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा अपेक्षित आहे.

**भारत-अमेरिका-व्यापार चर्चा**

भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार कराराच्या अनुषंगाने, चर्चेच्या नवीन फेरीला वॉशिंग्टनमध्ये सुरुवात होत आहे. उभय देशांमधील बहुप्रतिक्षित व्यापार कराराला अंतिम स्वरूप देणे हा यामागील उद्देश आहे. 20 ते 22 एप्रिल दरम्यान होणाऱ्या तीन दिवसांच्या चर्चेसाठी, वाणिज्य विभागातील अतिरिक्त सचिव दर्पण जैन यांच्या नेतृत्वाखाली भारतीय अधिकाऱ्यांचं एक पथक अमेरिकेत दाखल झालं आहे.

**तमिळनाडू -प.बंगाल निवडणूक**

एकाच टप्प्यात होणाऱ्या तामिळनाडू विधानसभा निवडणूक आणि पश्चिम बंगाल मधील विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील प्रचार आज समाप्त होणार आहे. या पार्श्वभूमीवर, मतदारांशी संवाद साधण्यासाठी विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी झंझावाती प्रचार दौरे आयोजित केले आहेत.

भाजपचे वरिष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आज पश्चिम बंगालमधील सिलिगुडी, पश्चिम बर्धमान, पश्चिम आणि पूर्व मेदिनिपुर जिल्ह्यातील उमेदवारांसाठी प्रचार सभा घेणार आहेत. तर, तृणमूल कॉंग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी, पूर्व मेदिनिपुर, बरांकपोर आणि जगदताल आदि ठिकाणी प्रचार सभांना संबोधित करणार आहेत. इतर पक्षांचे राजकीय नेते आजसुद्धा जाहीर सभांमध्ये सहभागी होतील, अशी अपेक्षा आहे.

तामिळनाडूमध्ये मतदानाला आता केवळ दोन दिवस उरले आहेत. येत्या 23 तारखेला एकाच टप्प्यात होणाऱ्या मतदानात, एकंदर 5 कोटी 73 लाख 43 हजार 291 मतदार, 234 मतदारसंघांसाठी आपले प्रतिनिधी निवडतील. राज्यात एकंदर 75 हजार 64 मतदान केंद्रं आणि 33 हजार 211 पूरक मतदान केंद्रं सज्ज ठेवण्यात आली आहेत, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी अर्चना पटनायक यांनी दिली.

**अहिल्यानगर**

महाराष्ट्रातील बारामती आणि राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठीचा प्रचारही आज संध्याकाळी संपणार आहे. बारामतीमध्ये आज प्रचाराची सांगता सभा होणार आहे. राहुरीमध्ये काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजपा उमेदवार अक्षय कर्डिले यांच्या समर्थनार्थ प्रचार सभा घेतली. राहुरीमध्ये नवीन एमआयडीसी तयार करून या भागातील तरुणांना उद्योग आणि रोजगार दिला जाईल असं आश्वासन फडणवीस यांनी दिलं.

**अमेरिका-इराण संघर्ष**

अमेरिका आणि इराण यांच्यात, इस्लामाबादमध्ये होणाऱ्या शांतता चर्चेच्या दुसऱ्या फेरीबाबत अनिश्चिततेचं वातावरण निर्माण झालं आहे. होर्मुझ सामुद्रधुनीतून होणाऱ्या जहाजांच्या दळणवळणाच्या मुद्द्यावरून दोन्ही देशांतील तणाव वाढत असून, दोन्ही बाजू कठोर भूमिका घेत आहेत. या दोन देशांमधील दोन आठवड्यांचा शस्त्रसंधी बुधवारी संपुष्टात येत आहे. दरम्यान, चर्चेच्या पुढील फेरीत सहभागी व्हायचं की नाही, याबाबत अद्याप कोणताही निर्णय घेतला नसल्याचं, इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते इस्माईल बाकाई यांनी सांगितलं.

तर, दुसरीकडे, हा संघर्ष संपुष्टात आणण्याची अमेरिकेला कोणतीही घाई नाही असं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितलं. या चर्चेदरम्यान कोणताही करार झाला नाही, तर, शस्त्रसंधीचा कालावधी वाढवला जाण्याची शक्यता कमी असल्याचा इशारा देतानाच, इराणसोबत, पाकिस्तानात लवकरच पुन्हा चर्चा सुरू होईल असा विश्वासही ट्रम्प त्यांनी व्यक्त केला.

**इस्राएल-लेबेनॉन चर्चा**

दरम्यान, इस्रायली आणि लेबनीज अधिकाऱ्यांमधे, अमेरिकेतील वॉशिंग्टनमध्ये, गुरुवारी, 23 एप्रिलला, शांतता चर्चेची दुसऱ्या फेरी होणार आहे. इस्राएल आणि लेबेनॉनचे अमेरिकेतील राजदूत या चर्चेत सहभागी होणार आहेत.

**मुख्यमंत्री**

संभाव्य एल निनोच्या पार्श्वभूमीवर पाण्याचं सुयोग्य नियोजन करावं, जलसंधारणाच्या कामांना गती द्यावी, असे निर्देश महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिले. संभाव्य एल निनोच्या पार्श्वभूमीवर राज्यातील परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली काल मुंबईत उच्चस्तरीय बैठक झाली. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, कृषि, वित्त आणि नियोजन राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते. योग्य नियोजन केलं तर राज्याला या परिस्थितीचा सक्षमपणे सामना करता येईल, असं मुख्यमंत्री म्हणाले.

**रेल्वे-विशेष गाड्या**

उन्हाळी सुट्ट्यांसाठी होणारी, प्रवाशांच्या वाढती मागणी लक्षात घेता, रेल्वे विभागानं, 15 एप्रिल ते 15 जुलै या काळात, उन्हाळी विशेष रेल्वेगाड्यांचं नियोजन केलं आहे.पुढील तीन महिन्यांत एकंदर 9 शे 8 विशेष गाड्या, देशभरात 18 हजार 262 फेऱ्या करतील. उन्हाळी सुट्टीच्या ऐन हंगामात लोकांना सुलभ आणि आरामदायी प्रवास करता यावा यासाठी ही पावलं उचलण्यात आल्याचं रेल्वे मंत्रालयानं सांगितलं आहे.

**रेल्वे दिव्यांग प्रवास**

युनिक डिसॅबिलिटी ओळखपत्र अर्थात UDID कार्ड धारक दिव्यांग व्यक्तींना रेल्वे गाड्यांमधील दिव्यांगांसाठी राखीव असलेल्या अनारक्षित डब्यांमध्ये प्रवास करण्याची परवानगी दिली जाईल, असं रेल्वे विभागानं सांगितलं आहे. दिव्यांग व्यक्ती सक्षमीकरण विभागाद्वारे जारी केलेले वैध UDID कार्ड असलेले दिव्यांग, तसंच, ज्यांना रेल्वेद्वारे सवलतीच्या दराची सुविधा मंजूर करण्यात आली आहे अशा इच्छित लाभार्थ्यांना सुविधा मिळाव्यात या उद्देशानं हा निर्णय घेतल्याचं रेल्वे विभागानं कळवलं आहे.

**जपान-भूकंप**

जपानला काल 7 पूर्णांक 7 रिख्टर क्षमतेच्या भूकंपाचा धक्का जाणवला. या भूकंपाचा केंद्रबिंदू पॅसिफिक महासागरात सुमारे 20 किमी खोलीवर होता. भूकंपाच्या पार्श्वभूमीवर, देशाच्या किनारपट्टी भागासाठी त्सुनामीचा इशारा जपानच्या हवामान विभागाने जारी केला आहे.

**जम्मू-काश्मीर अपघात**

जम्मू आणि काश्मीरमध्ये उधमपूर जिल्ह्यात काल एका प्रवासी बसला भीषण अपघात झाला; या अपघातात 21 जणांचा मृत्यू झाला तर 29 जण जखमी झाले. चालकाचं नियंत्रण सुटल्यानं ही बस खोल दरीत कोसळली. या दुर्घटनेतील मृतांच्या नातेवाईकांना तसंच जखमींना केंद्र आणि राज्य शासनानं मदत जाहीर केली आहे.

## या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.